## *अध्याय अठरावा प्रारंभ*



॥ श्री गणेशाय नमः ॥

जयजयाजी चिद्विलासा । हे गोविंदा श्रीनिवासा ।
हे आनंदकंदा परेशा । पाहि माम् दीनबंधो ॥१॥

हे केशवा केशीमर्दना । हे माधवा मधूसुदना ।
हे पूतनाप्राणशोषणा । पांडुरंगा रुक्मिणीपते ॥२॥

काय माझ्या आहे मनीं । तें तूं जाणसी चक्रपाणी ।
तेंच कां रे तुजलागुनी । बोलून दावूं पद्मनाभा ॥३॥

भक्त जी जी इच्छा करी । ती तूं पुरविसी श्रीहरी ।
ऐसें पुराणाभीतरीं । आहे वर्णन बहुसाळ ॥४॥

म्हणून माझ्या मनोरथा । पूर्ण करा पंढरीनाथा ।
सोडा मनीची कठोरता । दासगणू हा तुझा असे ॥५॥

आकोटाचे शेजारीं । मुंडगांव नामें एक नगरी ।
तेथें बायजा नामें खरी । समर्थांची भक्तीण असे ॥६॥

हळदी माळयाच्या वंशांत । इचा जन्म झाला सत्य ।
शिवराम नामें इचा तात । भुलाबाई जननी असे ॥७॥

बायजाचे बाळपणीं । लग्न झालें होतें जाणी ।
ललाटीं जें विधात्यांनीं । लिहिलें असेल तेंच घडे ॥८॥

बायजा आली तारुण्यांत । गर्भाधान करण्याप्रत ।
घेऊन गेला तिचा तात । जामाताच्या गृहासी ॥९॥

परी उपयोग नाहीं झाला । जामात षंढ होता भला ।
तेणें जनकजननीला । शोक झाला अनावर ॥१०॥

बायजेकडे पाहून । जननी करी रोदन ।
माझ्या बाईचें तारुण्य । वांझ पाहूं राहातें ॥११॥

भुली म्हणे शिवरामासी । बायजा न ठेवा ऐशी ।
दुसरा नवरा करून इसी । देणें आहे भाग पाहा ॥१२॥

शिवराम म्हणे त्यावर । ऐसा नको सोडूं धीर ।
हा पुरुषत्वाचा प्रकार । खरा एकदम कळेना ॥१३॥

कांहीं दिवस वाट पाहूं । नको ऐसी अधीर होऊं ।
बायजासी येथेंच ठेवूं । तिच्या सासुरवाडीला ॥१४॥

नपुंसकत्व अधोपरी । आलें असेल त्याला जरी ।
तें औषधाने होईल दुरी । वाट पाही यास्तव ॥१५॥

ऐसें उभयतां बोलून । बायजासी तेथें ठेवून ।
आले मुंडगांवाकारण । आपुल्या घरातें ॥१६॥

बायजीचें वय पंधरासोळा । वर्ण काळासावळा ।
तारुण्याने मुसमुसलेला । होता जिचा शरीरभाग ॥१७॥

डोळे नाक पाणीदार । बांधा उंच मनोहर ।
जिला पाहातां अंतर । कामुकाचें मोहित होई ॥१८॥

तिच्या थोरल्या दिरासी । पाहूनिया बायजासी ।
इच्छा जाहली मानसीं । संभोग तिचा करावया ॥१९॥

त्यानें प्रयत्न केले नाना । वळवावया तिच्या मना ।
म्हणूं लागला क्षणाक्षणा । ऐसें बायजाकारणें ॥२०॥

हताश ऐशी मुळीं न होई । मीच तुला पतीचें ठायीं ।
आमरण करीन पाही । तुझें वेडे संगोपन ॥२१॥

झुरणें दे हें सोडून । आनंदित ठेवी मन ।
वेडे आजपासून । मीच नवरा समज तुला ॥२२॥

ऐसें त्यानें सांगावें । चाळे नाना करावें ।
कांहीं आमिष दावावें । चित्त तिचें भुलवावया ॥२३॥

परी उपयोग होईना । बायजीच्या न हें येई मना ।
ती म्हणे हे नारायणा ! । कां रे दैन्य मांडलेंस ? ॥२४॥

बालपणापासून । ध्याइलें मी तुझे चरण ।
त्याचेंच कां हें मजलागून । फळ दृष्टीं पडावें ? ॥२५॥

जयाचा मी हात धरिला । तो ना पुरुष कळून आला ।
दैवयोग समजून चुकला । संसार नशिबीं नाहीं मम ॥२६॥

बरें झालें तुझ्या ठायीं । चित्त आतां रमेल पाही ।
कृपा करी रे शेषशायी । स्पर्श पुरुषाचा न होवो मला ॥२७॥

ज्येष्ठ दीर एके दिवसीं । येता झाला बायजापासीं ।
आपला हेतु कळविण्यासी । रात्रीचिया समयाला ॥२८॥

तो बायजानें इन्कार । करून केलें उत्तर ।
कैसी लाज तिळभर । नाहीं उरली चित्तीं तुझ्या ॥२९॥

तूं माझा ज्येष्ठ दीर । पित्यापरीस साचार ।
सोडा हा अविचार । स्वैर ऐसा होऊं नको ॥३०॥

ह्या तियेच्या भाषणा । तो ना आणी मुळीं मना ।
होतां कामाची वासना । नीति विलया जातसे ॥३१॥

अंगावरी टाकण्या हात । जों तों पाही इतक्यांत ।
तयाचा तो थोरला सुत । माडीवरून पडला हो ॥३२॥

खोक पडली डोक्यासी । बायजेनें धरिले त्यासी ।
बसवून आपुल्या मांडीसी । औषध लावूं लागली हो ॥३३॥

बायजा म्हणे ज्येष्ठ दीरा । या गोष्टीचा विचार करा ।
अभिलाष तो नाहीं बरा । परस्त्रियेचा केव्हांही ॥३४॥

मुलगा पडलेला पाहून । भय पावलें त्याचें मन ।
अनुताप त्यासी झाला पूर्ण । केलेलिया कर्माचा ॥३५॥

त्यानें नाद सोडिला । सदनीं निवांत राहिला ।
पुढे शिवराम घेऊन गेला । कन्येस आपुल्या मुंडगांवी ॥३६॥

भुलाई म्हणे पतीसी । चला जाऊं शेगावांसी ।
महाराजातें पुसायासी । पुढील भाकीत बायजेचें ॥३७॥

तें मानलें शिवरामासी । आला घेऊन कन्येसी ।
महाराजांतें पुसायासी । आपुल्या त्या कांतेसह ॥३८॥

बायजा घातली पायांवर । केली विनंति जोडून कर ।
कृपा करा या मुलीवर । पुत्र पौत्र द्यावे हिला ॥३९॥

तें समर्थांनीं ऐकिलें । शिवरामासी हांसत वदले ।
अरे नशिबीं नाहीं लिहिलें । विधात्यानें पुत्र हिच्या ॥४०॥

जेवढे पुरुष जगतांत । तेवढे असती हिचे तात ।
उगे न पडा फंदांत । लग्न हिचें करण्याच्या ॥४१॥

तें ऐकतां शिवरामाला । अनावर शोक झाला ।
घेऊन त्या बायजाला । परत आला मुंडगांवी ॥४२॥

परी त्या समर्थवचनांनीं । बायजा आनंदली मनीं ।
निष्ठा गजाननाच्या चरणीं । जडली तेव्हांपासून ॥४३॥

समर्थांचा एक भक्त । पुंडलीक नामें मुंडगांवात ।
त्याच्या संगें शेगांवात । बायजा येऊं लागली ॥४४॥

पहिल्या प्रथम अडथळा । जननीजनकें नाहीं केला ।
शेगांवास जाण्याला । पुंडलीकाचे बरोबर ॥४५॥

त्यांना ऐसें वाटलें । साधुचरण इनें धरिलें ।
तेच तिच्या करतील भले । निजकृपेने कल्याणा ॥४६॥

पुरुषत्व देतील जामातासी । अशक्य ना कांहीं संतांसी ।
ऐसा विचार मानसीं । करून राहिले स्वस्थ ते ॥४७॥

पुंडलीकाचे बरोबरी । बायजा जाऊं लागली खरी ।
तेणें पुकार जगभरी । ऐशा रीतिं जाहली ॥४८॥

हें शेगांवच्या वारीचें । ढोंग आहे दोघांचें ।
तरुणपणीं मानवाचें । मन परमार्थी लागेना ॥४९॥

बायजा आहे तरणीज्वान । पुंडलीकासीही तारुण्य ।
यांची वारी विषयभान । हीच आहे निःसंशय ॥५०॥

परस्परें प्रीति जडली । विषयसुखाची नवाळी ।
भोगण्या ही युक्ति केली । वाटते या उभयतांनीं ॥५१॥

पुंडलीक जरी माळी असता । तरी हा संबंध योग्य होता ।
बायजाच्या धरण्या हाता । कां की तरुण दोघेही ॥५२॥

पुंडलीक आहे मराठी। ही माळ्याच्या आली पोटीं।
म्हणून यांची ताटातुटी। केलीच पाहिजे जातीस्तव ॥५३॥

या दोघांचे अंतर। शुध्द होतें साचार।
नव्हतां कामाचा विकार। मनीं उत्पन्न जाहला ॥५४॥

भुलाई म्हणे बायजासी। तूं कां कारटे अहर्निशीं।
पुंडालीकाच्या घरा जासी। हें कांहीं कळेना ? ॥५५॥

ऐशा तरुण वयांत। तुम्हां कशाचा परमार्थ ?।
कोल्हा न राही उपोषित। उंसाचिया फडामधीं ॥५६॥

वा पाहून बाटुकाला। बैल नाहीं पुढें गेला।
कारटें आमुच्या नांवाला। काळें उगें लावूं नको ॥५७॥

भुलाई म्हणे नवऱ्यासी। हिला नका ठेवूं ऐसी।
लावून द्यावे मोहतरासी। पाहा पोरगा माळ्याचा ॥५८॥

ही पुंडलिकाच्या घरी जातें। सदा त्यासी हितगुज करितें।
एकमेकां पाहून भरतें। येत दोघां प्रेमाचें ॥५९॥

जाऊं चला शेगांवास। घेऊन या कारटीस।
सांगूं अवघे महाराजास। चाळे या बायजीचे ॥६०॥

संतासी अवघें कळतें। ते सन्नीतीचे चाहाते।
पोटामाजीं कधीं न निघते। चंदनाच्या दुर्गंधी ॥६१॥

भुला शिवराम बायजाबाई। पुंडलीक भोकऱ्या आला तोही।
चौघे येऊन लागले पायीं। शेगांवीं श्रीसमर्थांच्या ॥६२॥

पुंडलीकासी पाहून। बोलूं लागले दयाघन।
कीं बायजा तुझी बहीण। पूर्वजन्मीची पुंडलीका ॥६३॥

लोक निंदा जरी करिती। तरी अंतर न द्यावे इजप्रती।
दोघे मिळून करा भक्ति। सच्चिदानंद हरीची ॥६४॥

भुले आपुल्या पोरीस। लावूं नको भलतां दोष।
हीं बहीणभाऊ आहेत। मुळींच पूर्वजन्मींचे ॥६५॥

शिवाय या बायजांला। कोठेंही न नवरा भला।
ही न आली करायाला। संसार मुळीं जगामध्यें ॥६६॥

ही राहील ब्रह्मचारी। अशीच गे जन्मभरी।
जनाबाई पंढरपुरीं। अशाच रीतिं राहिली गे ॥६७॥

तिनें नामदेव गुरू केला। ही शरण आली आम्हांला।
माझ्या जनाबाईला। कोणी न आतां छळावें ॥६८॥

ऐसें समर्थांचें भाषण। शिवरामानें ऐकून।
गेला असे गहिंवरून। शब्द न कांहीं बोलवे॥६९॥

घेऊन आपुल्या मुलीला। शिवराम मुंडगांवासी आला।
पुढें बायजाच्या वारीला। अडथळा कोणी केला नसे॥७०॥

महाराज आपुल्या भक्ताप्रत। सदैव रक्षण करितात।
तें कसें, ही थोडक्यांत। गोष्ट सांगतों ये ठाईं॥७१॥

भाऊ राजाराम कवर। एक होता डॉक्टर।
पहा खामगांवावर। दवाखान्याचा अधिकारी॥७२॥

त्यास दुर्धर फोड झाला। आणविलें मोठया डॉक्टराला।
औषधपाणी करायाला। खामगांवा माझारीं॥७३॥

बुलढाणा अकोला उमरावती। येथून डॉक्टर आणिले असती।
शस्त्रक्रिया करण्याप्रती। त्या भाऊच्या फोडाला॥७४॥

नाना औषधें पोटांत दिली। विविध पोटीसें बांधिलीं।
शस्त्रक्रिया ही असे केली। त्या झालेल्या फोडाला॥७५॥

कशाचा ना उपयोग झाला। फोड वाढूं लागला।
वडील बंधूस धाक पडला। त्या भाऊच्या दुखण्याचा॥७६॥

भाऊ तळमळे शय्येवरी। व्याधि असह्य झाली खरी।
शेवटीं त्यानें अंतरी। विचार ऐसा केला हो ॥७७॥

आतां हाच उपाय। आठवावे सद् गुरु पाय।
याविणें दुसरी सोय। कांही नसे राहिली ॥७८॥

पडल्या पडल्या जोडी हात। म्हणे धांव धांव हे सद् गुरुनाथ।
या लेंकराचा वृथा अंत। किमपि आता पाहूं नको ॥७९॥

ऐसी श्रोते विनवणी। करूं लागला क्षणोक्षणीं।
रात्र गेली उलटोनी। सुमारे समय एकाचा ॥८०॥

तमानें भरलें अंबर। रात्रीचा तो शब्द किर्र।
कोल्हे हुकेनें कांतार। दणाणून गेलें हो ॥८१॥

तों एक दमणी आली। तट्ट्यावरी लागलेली।
गाडीस होती जुंपिली। जोडी खिलाऱ्या बैलांची ॥८२॥

कंठामाजीं घांगरमाळा। वाजूं लागल्या खळखळा।
मागें पुढें सोडिला। होता पडदा दमणीस ॥८३॥

दवाखान्याच्या दारापाशीं। दमणी आली निश्चयेंसी।
डॉक्टर पाहात होता तिसी। पडून आपल्या शय्येवर ॥८४॥

तों एक उतरला । ब्राह्मण दमणीला खाली भला ।
दार ठोठावूं लागला । डॉक्टराच्या बंगल्याचें ॥८५॥

डॉक्टराच्या बंधूनी । दार उघडले ते क्षणीं ।
प्रश्न केला कोठूनी । आपण आलांत ये ठायां ? ॥८६॥

ब्राह्मण बोले त्याकारण । माझें गजा नामाभिधान ।
तीर्थ अंगारा घेऊन । शेगांवाहून आलों मी ॥८७॥

डॉक्टर भाऊ कवराला । जो कां आहे फोड झाला ।
हा अंगारा पाठविला । लावण्या त्या फोडासी ॥८८॥

प्यावयासी दिलें तीर्थ । हें घ्या आपुल्या हातांत ।
मी जातों आतां परत । वेळ न मशीं राहावया ॥८९॥

तीर्थ अंगारा देऊन । निघून गेला ब्राह्मण ।
त्या शोधाया कारण । भाऊनें शिपाई पाठविला ॥९०॥

परी न पत्ता लागला । गाडी न दिसली कवणाला ।
भाऊ मनीं घोटाळला । कशाचा ना तर्क चाले ॥९१॥

फोडास लावितां अंगारा । तो तात्काळ फुटला खरा ।
येऊं लागला भराभरा । पूं त्या श्रोते फोडांतून ॥९२॥

एक घटका गेल्यावर । पूं गेला निघून पार ।
पाहा किती आहे जोर । समर्थांच्या अंगाऱ्याचा ! ॥९३॥

भाऊस निद्रा लागली । व्याधी पुढें बरी झाली ।
हळुं हळुं शक्ति आली । भाऊ झाला पूर्ववत् ॥९४॥

दर्शना गेला शेगांवास । तों समर्थ वदले ऐसें त्यास ।
माझ्या गाडी बैलास । नुसता न चारा दिलास तूं ॥९५॥

हें सांकेतिक भाषण । कळलें भाऊलागून ।
हृदय आलें उचंबळून । त्या भाऊ कवराचें ॥९६॥

त्या रात्रीचा ब्राह्मण । खचित माझा गजानन ।
लेंकरासाठीं धांवून । खामगांवास आला हो ॥९७॥

कवरें केलें अन्नदान । त्या व्याधीच्या निमित्त जाण ।
अंतर्ज्ञानी असती पूर्ण । श्रीगजानन अवलिया ॥९८॥

असो एकदां समर्थस्वारी । निघती झाली पंढरपुरीं ।
त्या श्रीचंद्रभागेतीरीं । विठ्ठलासी भेटावया ॥९९॥

होती मंडळी बरोबर । दिवस वारीचा साचार ।
स्पेशल गाडया वरचेवर । जाऊं लागल्या पंढरीला ॥१००॥

जगू आबा, पाटील हरी । बापुना व मंडळी दुसरी ।
सोडूनिया शेगांव नगरी । नागझरीला आले हो ॥१॥

त्या गांवीं माळावर । आहे एक भुयार ।
येथें गोमाजी नामें साधुवर । समाधिस्थ झालासे ॥२॥

झरे जिवंत पाण्याचे । आसपास त्या माळाचे ।
आहेत म्हणून गांवाचें । नांव पडलें नागझरी ॥३॥

हा गोमाजी बोवा साचा । गुरू महादजी पाटलाचा ।
प्रथम आशीर्वाद झाला साचा । शेगांवींच्या पाटीलवंशा ॥४॥

म्हणून पाटील शेगांवचे । गोमाजीला वंदून साचे ।
रस्त्यास लागती पंढरीचे । ऐसा त्यांचा परिपाठ ॥५॥

या परिपाठें म्हणून । नागझरीसी येऊन ।
अग्निरथांत बैसून । निघते झाले पंढरीला ॥६॥

हरी पाटला बरोबरी । समर्थांची होती स्वारी ।
बापुना आणि दुसरी । माणसे पांचपन्नास ॥७॥

आषाढ शुध्द नवमीचा । तो दिवस होता साचा ।
समुदाय वारकऱ्यांचा । येऊं लागला पंढरीसी ॥८॥

मेघ दाटले अंबरीं। क्वचित् कोठें भूमीवरी।
पर्जन्याची वृष्टी खरी। होऊं लागली श्रोते हो ! ॥०९॥

तें भुवैकुंठ पंढरपुर। गजबजून गेलें फार।
भरती येतां सागर। जेवीं जाय उचंबळोनी ॥११०॥

प्रदक्षिणेच्या रस्त्यावरी। टाळांची ती गर्दी खरी।
'जय जय रामकृष्ण हरी'। भक्त म्हणती उच्च स्वरें ॥११॥

शब्द कवणाचा कवणाला। न ये ऐकावयाला।
ऐसा आनंदी आनंद चालला। तो वानूं कोठवर ॥१२॥

नाथ निवृत्ति ज्ञानेश्वर। सांवता गोरा कुंभार।
श्रीतुकोबा देहूकर। सोपान मुक्ता जनार्दन ॥१३॥

या संतांच्या पालख्या। पंढरीस आल्या देखा।
भक्तांनी उधळिला बुक्का। आदर करायाकारणें ॥१४॥

त्यायोगें आकाशांत। बुक्क्याचें जणू झालें छत।
सुवास उठला घमघमीत। गर्दी तुळशीफुलांची ॥१५॥

श्रोते त्या समयाला। समर्थ आले पंढरीला।
उतरले जाऊन वाडयाला। त्या कुकाजी पाटलाच्या ॥१६॥

हा प्रदक्षिणेच्या वाटेवरी । वाडा चौफाळ्याशेजारीं ।
दर्शनाला भीड खरी । झाली असे राऊळांत ॥१७॥

पोलिस हाताहातावरी । उभे राहिले रस्त्यांतरीं ।
पथें चालले वारकरी । भजन करीत हरीचें ॥१८॥

एकादशीस साचार । हरी पाटलाबरोबर ।
बापुनाविना इतर । गेले दर्शना हरीच्या ॥१९॥

बापुना मागें राहिला । तो होता स्नानासी गेला ।
म्हणून त्यासी वेळ झाला । मंडळी गेली निघून ॥१२०॥

स्नान करून आला घरीं । तों समजलें ऐशापरी ।
दर्शनासी गेली सारी । आत्तांच मंडळी विठ्ठलाच्या ॥२१॥

मग तोही निघाला पळत पळत । दर्शनाचा धरून हेत ।
राऊळाच्या भोंवतीं अमित । गर्दी झाली लोकांची ॥२२॥

मुंगीस वाट मिळेना । तेथे हा बापुना ।
केवीं जाईल दर्शना । शिवाय गरिबी पदरांत ॥२३॥

बापुना म्हणे मानसीं । हे विठ्ठला हृषीकेशी ।
कां रे निष्ठुर झालासी ? । मजला देई दर्शन ॥२४॥

तूं सांवत्या माळ्याकारण। अरणीं गेलास धांवून।
तेवीं येई राउळातून। मज भेटाया पांडुरंगा॥२५॥

‘अरण’ होतें आठ कोस। तैसें नव्हें येथें खास।
मी मंदिराच्या सान्निध्यास। उभा आहे वाटेवरी॥२६॥

तुला लोक म्हणतात। तूं अनाथाचा असशी नाथ।
मग कां रे देवा मजप्रत। उपेक्षिलें या वेळीं ?॥२७॥

ऐसा बहुत धांवा केला। शेवटीं बापुना हताश झाला।
परत बिऱ्हाडासी आला। अस्तमानाचे समयास॥२८॥

मुख झालें होतें म्लान। अवघ्या दिवसाचें उपोषण।
बापुनाचे अवघें मन। विठ्ठलाकडे लागलें॥२९॥

शरीर मात्र होतें घरीं। मन मंदिराच्या सभोंवरी।
फिरत होतें भिरीभिरी। याचें नांव ध्यास हो॥१३०॥

बापुनासी पाहून। हंसूं लागले अवघेजण।
हा बेटा अभागी पूर्ण। कळून आला आपणां॥३१॥

शेगांवाहून दर्शना। पंढरीसी आला जाणा।
येथें येऊन खेळ नाना। फिरला पाहात गांवामध्यें॥३२॥

याची दांभिक अवघी भक्ति। यास कशाचा श्रीपती ?।
ऐन वेळेला राहती। गैरहजर दुर्दैवी ! ॥३३ ॥

कोणी म्हणाले बापुनाला। वेदान्त आहे अवघा आला।
तो कशाशीं दर्शनाला। जाईल सांगा राउळांत ॥३४॥

त्याचा भगवंत हृदयांत। आहे सर्वदा खेळत।
वेदान्त्यांचे ऐसें मत। दगडांमाजीं काय आहे ? ॥३५॥

आपण वेडे म्हणून। घ्याया गेलों दर्शन।
बापुनाचा नारायण। वाटेल तेथे उभा असे ॥३६॥

मग दुसरा म्हणाला। मग हा येथे कशास आला ?।
कां शेगांवी तयाला। भेटला नसता ईश्वर ? ॥३७॥

अहो हे वेदान्ती। लोकां ज्ञान सांगती।
शब्द चावटी हमेश करिती। अनुभवाचा लेश नसे ॥३८॥

सगुणोपासना झाल्या पूर्ण। मग होणार आहे ज्ञान।
न आल्यासी लहानपण। तरुणपणा येतो कसा ? ॥३९॥

ऐसा उपहास तयाचा। प्रत्येकानीं केला साचा।
अवघ्यांपुढें एकटयाचा। टिकाव लागावा कोठूनी ? ॥१४०॥

तो बापुना बसला उपोषित । दांतांसी लावूनी दांत ।
ते होते अवघे पहात । स्वामी निजल्या जाग्याहून ॥४१॥

गरीबाचें सांकडें । साधुलाच एक पडे ।
सत्संगती ज्याला घडे । तेच खरे भाग्यवान ॥४२॥

समर्थ म्हणती बापुना । दुःख नको करूंस मना ।
ये तुला रुक्मिणीरमणा । भेटवितों ये काळीं ॥४३॥

तों महाराज उभे राहिले । कटीं हात ठेविले ।
पाय खालीं जुळविले । समचरण दावावया ॥४४॥

तुळशीफुलांच्या माळा कंठीं । मूर्ति सांवळी गोमटी ।
बापुनाच्या पडली दृष्टी । शीर ठेविलें पायांवर ॥४५॥

पुन्हां जो पाहे वरी । समर्थ दिसले पहिल्यापरी ।
तेणें बापुनाच्या अंतरीं । अति आनंद जाहला ॥४६॥

धोतर, पागोटें आणि शेला । जो घरी दृष्टि पडिला ।
तोच त्यानें पाहिला । दर्शना जातां राऊळांत ॥४७॥

इतर म्हणाले महाराजांस । तसेंच दर्शन आम्हांस ।
होऊ द्या आम्हां आहे आस । पुनरपि श्रीच्या दर्शनाची ॥४८॥

ऐसें ऐकतां भाषण । बोलते झाले गजानन ।
बापुनासारिखें आधीं मन । तुम्ही करा रे आपुलें ॥४९॥

तें तसें झालियावरी । दर्शन घडवीन निर्धारीं ।
ही दर्शन वस्तु खरी । काय मिळे बाजारांत ? ॥१५०॥

म्हणून ती आणून । देऊं तुम्हांकारण ।
निष्पाप करा आधीं मन । तरीच पुढचें घडेल हें ॥५१॥

पहा समर्थांनी बापुनाला । विठ्ठल साक्षात् दाखविला ।
कुकाजीच्या वाडयाला । संतत्व हा खेळ नसे ॥५२॥

संत आणि भगवन्त । एकरूप साक्षात् ।
गुळाच्या त्या गोडीप्रत । कैसें करावें निराळें ? ॥५३॥

काला घेऊन अखेरी । मंडळी फिरली माघारी ।
बापुनाच्या अंतरीं । दर्शन तें ठसावलें ॥५४॥

याच पुण्यें करून । पुत्र झाला त्याकारण ।
रसिक चतुर विद्वान् । संतसेवा न जाई वृथा ॥५५॥

पंढरीच्या प्रसादानें । पुत्र झाला त्याकारणें ।
म्हणूनच नांव त्यानें । ठेविलें नामदेव बालकासी ॥५६॥

कवठे बहादूर गांवाचा । एक माळकरी होता साचा ।
तो वऱ्हाड प्रांताचा । म्हणून उतरला वाडयांत ॥५७॥

तेथें आषाढी द्वादशीसी । मरी आली मुक्कामासी ।
त्या पंढरपुरक्षेत्रासी । मग काय विचारितां ? ॥५८॥

प्रेतामागें चाले प्रेत । पोलिस शिरती घरांत ।
यात्रा काढून देण्याप्रत । डॉक्टराच्या हुकुमानें ॥५९॥

वारकऱ्याला ओढिती । गाडीमाजीं बसविती ।
चंद्रभागेच्या पार करिती । कुर्डुवाडी रस्त्याला ॥१६०॥

हा कवठे बहादूरचा वारकरी । झाला मरीनें आजारी ।
ढाळ होती वरच्यावरी । उलटी मुळींच थांबेना ॥६१॥

गोळे हातांपायांसी । येऊं लागले बहुवशी ।
कोणी न जाई त्याजपाशीं । शुश्रुषा त्या करावया ॥६२॥

पोलिसभयानें हें वृत्त । कळविलें ना कोणाप्रत ।
शेगांवीचे समस्त । लोक जाया निघाले ॥६३॥

वाडा घटकेंत मोकळा झाला । हा वारकरी मात्र होता पडला ।
कठीण काळच्या समयाला । कोणी न येती उपयोगी ! ॥६४॥

लोक सुखाचे सोबती । संकटकालीं अव्हेरिती ।
तेथें एक रक्षण करती । संत अथवा देव हो ॥६५॥

तो पाहून प्रकार । श्रीगजानन साधुवर ।
म्हणाले हा ओसरीवर । निजला यास घेऊन चला ॥६६॥

लोक म्हणती गुरुराया ! । हा बहुतेक मेला सदया ।
याच्या नादीं लागतां वाया । संकट येईल आपणांतें ॥६७॥

पन्नास माणूस बरोबर । आपल्या येधवां साचार ।
मरीचा तो झाला जोर । सांप्रत या पंढरीसी ॥६८॥

अशा स्थितींत ये ठाईं । थांबणें हें कांहीं बरें नाहीं ।
चला जाऊं लवलाही । चंद्रभागेच्या पलीकडे ॥६९॥

तों महाराज म्हणती अवघ्यांला । तुम्ही कैसें खुळावला ? ।
आपल्या देशबंधूला । सोडितां हें बरें नव्हे ! ॥७०॥

ऐसें वादून जवळ गेले । वारकऱ्याच्या करा धरलें ।
त्यासी उठून बसविलें । आणि केलें मधुरोत्तर ॥७१॥

चाल बापा ऊठ आतां । जाऊं आपल्या वऱ्हाडप्रांता ।
वारकरी म्हणे गुरुनाथा ! । आतां वऱ्हाड कशाचें हो ? ॥७२॥

समीप आला माझा अंत । जवळ नाहीं कोणी आप्त ।
तईं म्हणाले सद् गुरुनाथ । वेडया ! ऐसा भिऊं नको ॥७३॥

तुझें टळलें गंडांतर । ऐसे वदोन ठेविला कर ।
त्या वारकऱ्याच्या शिरावर । ढाळ उलटी बंद झाली ॥७४॥

वाटूं लागली थोडी शक्ति । उभा राहिला त्वरित गती ।
संतानें ज्या धरिलें हातीं । त्यातें निजमनें यम नेई कैसा ? ॥७५॥

घटकेंत झाला पहिल्यापरी । मंडळींच्या बरोबरी ।
चंद्रभागेच्या पैलतीरीं । आला समर्थांसमवेत ॥७६॥

आनंद झाला फार त्यासी । वंदी समर्थचरणांसी ।
म्हणे दयाळा काढिलें मशीं । दाढेंतून काळाच्या ॥७७॥

ऐसा घडतां चमत्कार । भक्त करिती जयजयकार ।
आले कुर्डुवाडीवर । निर्धास्तपणें सर्वही ॥७८॥

पंढरीची करून वारी । आली शेगांवाप्रती सारी ।
मंडळी ती बरोबरी । श्रीगजाननस्वामींच्या ॥७९॥

एक कर्मठ ब्राह्मण । घ्याया आला दर्शन ।
त्या शेगांवाकारण । श्रीगजाननस्वामीचें ॥१८०॥

तयानें स्वामींची कीर्ति । निजदेशीं ऐकिली होती ।
म्हणून आला दर्शनाप्रती । फार लांबून त्या ठायां ॥८१॥

सोंवळें ओंवळें त्याचें अती । तो होता मध्वमती ।
खट्टू झाला परम चित्तीं । समर्थांसी पाहातां ॥८२॥

व्यर्थ आलों म्हणे येथ । या वेडयासी वंदण्याप्रत ।
हा भ्रष्टाचा आहे सत्य । सार्वभौम शिरोमणी ॥८३॥

सोंवळें ओंवळें येथ मेलें । अनाचाराचें राज्य झालें ।
अशा पिशाला म्हणूं लागले । साधु लोक हाय हाय ॥८४॥

तो तया मठांत । काळें कुत्रें झालें मृत ।
पडले होतें त्याचें प्रेत । येण्याजाण्याच्या वाटेवरी ॥८५॥

त्या श्वानातें पाहून । ब्राह्मण झाला मनीं खिन्न ।
आणूं कसें जीवन । श्वान मध्यें पडला हा ॥८६॥

याला न कोणी उचलती । गांजा सदैव धुनकिती ।
या वेडयातें वंदिताती । "महाराज, महाराज" म्हणून ॥८७॥

जळो याचें साधुपण । मला बुध्दि कोठून ।
झाली याचें दर्शन । घ्याया कां हे कळेना ? ॥८८॥

त्याचा संशय फेडावया। समर्थ आसन सोडोनिया।
येते झाले तया ठायां। जेथें होता ब्राह्मण ॥८९॥

आणि म्हणाले तयाप्रत। पूजा करावी यथास्थित।
कुत्रें झालें नाही मृत। संशय उगा घेऊं नका ॥१९०॥

तें ऐकून रागावला। नीज समर्था बोलूं लागला।
अरे नाहीं वेड मला। तुझ्यासम लागलेलें ॥९१॥

कुत्रें मरून झाला प्रहर। त्याचें प्रेत रस्त्यावर।
पडलें याचा विचार। तुम्हीं न कोणी केला कीं ॥९२॥

ऐसें ऐकतां विप्राला। समर्थांनीं जाब दिला।
आम्ही भ्रष्ट आम्हांला। तुमच्या सम ज्ञान नाहीं ॥९३॥

परी खंति न करा तिळभर। पाणी आणाया घागर।
घेऊन चलावे सत्वर। माझ्यामागें विप्रवरा ॥९४॥

ऐसें बोलून कुत्र्यापासी। येते झाले पुण्यराशी।
स्पर्श पदाचा करतां त्यासी। कुत्रें बसलें उठोन ! ॥९५॥

तो पाहतां चमत्कार। ब्राह्मण झाला निरुत्तर।
म्हणे याचा अधिकार। थोर आहे देवापरी ॥९६॥

मीं व्यर्थ निंदा केली । योग्यता ना जाणली ।
ऐसें म्हणून घातली । समर्थांच्या मिठी पायां ॥९७॥

माझे अपराध गुरुवरा ! । आज सारे क्षमा करा ।
वरदहस्त ठेवा शिरा । मी अनंत अपराधी ॥९८॥

तूंच सोंवळा साचार । एक आहेस भूमिवर ।
करण्या जगाचा उध्दार । तुम्हां धाडिलें ईश्वराने ॥९९॥

श्रोते त्याच दिवशीं भली । समाराधना त्यानें केली ।
कुशंका मनाची पार फिटली । लीन झाला अत्यंत ॥२००॥

प्रसाद घेऊन गेला परत । आपुल्या तो देशाप्रत ।
समर्थ साक्षात् भगवंत । ऐसी प्रचीति आली तया ॥१॥

स्वस्ति श्रीदासगणूविरचित । हा श्री गजाननविजय नामें ग्रंथ ।
भाविकां लाभो सत्पथ । हेंचि इच्छी दासगणू ॥२०२॥

शुभं भवतु ॥ श्रीहरिहरार्पणमस्तु ॥
॥ इति श्री गजानन विजय ग्रंथस्य अष्टादशोऽध्यायः ॥

@@@@@